महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

===========================================================================

जावक क्रमांक – ३१०१/४५ दिनांक :- १७ ऑगस्ट, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

# म्हाडा सोडत ऑनलाईन अर्ज प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी मुंबई मंडळातर्फे १९ ऑगस्ट रोजी लाईव्ह वेबिनार

मुंबई, दि. १७ ऑगस्ट, २०२४ :- म्हाडाच्या ऑनलाईन संगणकीय सोडतीसाठी अर्जदारांना अधिक सुलभतेने अर्ज सादर करता यावा, याकरिता म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे दिनांक १९ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी १२ वाजता लाईव्ह वेबिनार आयोजित करण्यात आला आहे.

मुंबईतील विविध गृहनिर्माण प्रकल्पांतील २०३० सदनिकांच्या विक्रीसाठी दि. ०९ ऑगस्ट २०२४ पासून म्हाडाचे संकेतस्थळ https://housing.mhada.gov.in व मोबाइल अॅपद्वारे ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज स्वीकृती प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे.

म्हाडा सदनिका विक्रीची संगणकीय सोडत ही पूर्णतः ऑनलाईन असल्याने सोडत प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याकरिता अर्जदारांना मार्गदर्शन करण्यासाठी मंडळातर्फे हा उपक्रम राबविण्यात येत आहे. मंडळातर्फे आयोजित या वेबिनारमध्ये सहभागी होण्यासाठी म्हाडाच्या सोडतीकरिता यापूर्वी व सध्या चालू असलेल्या सोडतीसाठी ज्या अर्जदारांनी नोंदणी केली आहे तसेच नोंदणी करण्यास इच्छुक आहेत त्यांनी https://youtube.com/live/asSycqY6Dvc?feature=share या लिंकवर जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच म्हाडाच्या सोडतीसाठी नोंदणी केलेल्या अर्जदारांना एसएमएसद्वारे व म्हाडाच्या https://mhada.gov.in या संकेतस्थळावरही Live Webinar ची Link उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. म्हाडाचे अधिकृत यूट्यूब चॅनल व फेसबुक पेज @mhadaofficial वरही या वेबिनारचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे.

या वेबिनारमध्ये मुंबई मंडळाचे उपमुख्य अधिकारी (पणन) श्री. राजेंद्र गायकवाड, म्हाडाच्या मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी श्रीमती सविता बोडके, माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी श्री. संदीप बोदेले इच्छुक अर्जदारांच्या शंकांचे निरसन करून माहिती देणार आहेत.

इच्छुक अर्जदारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात येत आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

Outward No. 3105/45 Dt. 17/08/2024

**Press Release**

# Join MHADA's August 19th Webinar: A Step-by-Step Guide to the Mumbai Housing Lottery's Online Application

Mumbai, August 17, 2024: The Mumbai Housing and Area Development Board , a unit of MHADA, has organised a live webinar on August 19, 2024, at 12:00 PM, aimed at guiding applicants through the online application process for its upcoming housing lottery. This initiative is designed to provide clear, step-by-step instructions to ensure a seamless and straightforward experience for all participants.

The online registration for the sale of 2,030 flats across various housing projects in Mumbai commenced on August 9, 2024. Applicants can submit their applications via MHADA's official website https://housing.mhada.gov.in or through the mobile application.

As the entire lottery process is conducted online, MHADA has organized this webinar to address any queries and offer comprehensive guidance to applicants. Those who have previously registered, as well as new applicants, are encouraged to join the live session by visiting https://youtube.com/live/asSycqY6Dvc?feature=share. The webinar link has also been provided to registered applicants via SMS and is available on MHADA's website https://mhada.gov.in. Additionally, the webinar will be streamed live on MHADA's official YouTube channel and Facebook page @mhadaofficial.

Senior officers including Mr. Rajendra Gaikwad, Deputy Chief Officer (Marketing) of the Mumbai Board, Mrs. Savita Bodke, Chief Information and Communication Technology Officer, and Mr. Sandeep Bodele, Information and Communication Technology Officer, will address to the queries of the aspiring lottery applicants and provide detailed insights into the application process.

MHADA appeals all the interested applicants to take advantage of this opportunity to ensure a smooth and successful participation in the upcoming housing lottery.

(Vaishali Gadpale)

Chief Public Relations Officer / MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial